# फळशास्त्र विभाग

## उद्यानविद्या विद्याशाखा

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

क्र.वि.प्र./ फळ रोप वाटिका/ ३८ /२०१९ दि. ११/०९/२०१९

**दर पत्रक**

प्रती,

.................................................

...............................................

...............................................

**विषय: फळ झाडाकरिता शेंडा कलम व डोळा कलम बाह्यस्त्रोतातून करार पद्धतीने करणे बाबत.**

वरील विषयाच्या अनुषंगाने कृपया सोबत दिलेल्या अटी व शर्तीच्या अधीन राहून आंबा, सिताफळ, संत्रा, मोसंबी ई. फळ झाडांच्या कलमीकरण करण्या करिता दरपत्रके खालील प्रमाणे या कार्यालयास विहित मुदतीत सादर करण्याचे करावेत.

| अ.क्र. | कामाचे विवरण | शेरा |
|---|---|---|
| १ | आंब्याची शेंडा कलम बांधणी (Grafting) | चारही फळ पिकांच्या कलम बांधणी करिता स्वतंत्रपणे दर सादर करावे. कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) काम पूर्ण झाल्या नंतर तर उर्वरित (५०%) रक्कम हि कलमे यशस्वी झाल्या नंतर अदा करण्यात येईल. |
| २ | सीताफळाची शेंडा कलम बांधणी (Grafting) | |
| ३ | चीकू शेंडा कलम बांधणी (Grafting) | |
| ४ | संत्रा व मोसंबी डोळा कलम बांधने (Budding) | |

**टिप:** सर्व दर पत्रके दि. १९/०९/२०१९ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत या कार्यालयास सादर करावेत.

सर्व दर पत्रके हे **विभाग प्रमुख, उद्यानविद्या विभाग** यांच्या नावे खालील कार्यालयीन पत्त्यावर विहित मुदतीच्या आत पोहचविण्याचे करावे.

विभाग प्रमुख
फळशास्त्र विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Inward No. 213 Dt.: 12/09/19

## दर पत्रका विषयी नियम व अटी शर्ती

१. दर पत्रके मोहरबंद लिफाफ्या मध्ये सादर करावीत.

२. लीफापाच्या डाव्या बाजूस स्पष्ट अक्षरात **'शेंडा कलम व डोळा कलम करणे बाबत फळशास्त्र विभागा करिता''** असे नमूद करावे तसेच दर पत्रक मध्ये या कार्यालयाचा संदर्भ पत्रक क्र. वि.प्र./ फळ रोप वाटिका/ ३८८ /२०१९ व दि. ११ /०९/२०१९ नमूद करावे.

३. देयक सादर करतांना, जी.एस.टी. संबधी शासन निर्णय जुलै २०१७ मधील नियम व अटी ची पूर्तता करण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची स्वतःची असेल.

४. काम करणाऱ्या मजुरांचा सामुहिक विम्याची (Group Insurance) ई. ची जबाबदारी संबंधित ठेकेदाराची असेल व कुठल्याही प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती अथवा शारीरिक हानी उदा. वीज पडणे, साप चावणे, झाडावरून पडणे व शेतीस अनसरून ईतर ईजा ई. बाबत हे कार्यालय कुठल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही/ स्वीकारणार नाही.

५. काम अपूर्ण अवस्थेत सोडून दिल्यास कामाचा मोबदला दिल्या जाणार नाही याची नोंद घ्यावी.

६. समान दरपत्रके व दर आठळून आल्यास या पूर्वी केलेल्या काम आणि अनुभव यांना प्राधान्य देण्यात येईल व या बाबतचे सर्व अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता यांचे असतील.

७. कोणतीही निविदा पूर्ण पणे अंशतःस्वीकारणे किंवा आलेल्या सर्व दर पत्रके नाकारणे याचे अधिकार हे निम्नस्वाक्षरी कर्ता तसेच गठीत समितीचे यांचे असतील.

८. संबंधित ठेकेदाराने कामाचे दर हे किती दिवसा करिता वैध आहेत हे दर पत्रकात स्पष्ट नमूद करावे अन्यथा सदरचे दर हे १८० दिवसा करिता ग्राह्य धरण्यात येतील.

९. काही तांत्रिक अथवा कार्यालयीन कारणास्तव देयेक अदा करण्यास उशीर झाल्यास संबंधित ठेकेदारास मजुरांचे देयक अदा करण्याची स्वतः जबाबदारी राहील.

**१०. कलम बांधणीच्या कामाचा मोबदला हा दोन टप्प्यात अदा करण्यात येईल, पन्नास टक्के (५०%) काम पूर्ण झाल्या नंतर तर उर्वरित (५०%) रक्कम हि कलमे यशस्वी झाल्या नंतर अदा करण्यात येईल.**

११. यशस्वी झालेल्या कलम मोजून देण्याची जबाबदारी हि ठेकेदाराची असेल.

१२. दर पत्रके मंजूर करणे अथवा काम समाधानकारक नकेल्यास सदर करार रद्द करणे या बाबत चे सर्व हक्क समितीने स्वतः कडे राखून ठेवले आहेत.

१३. या प्रक्षेत्रावरील कलमे व इतर उत्पादने कोणत्याही सबबीवर बाहेर नेता येणार नाहीत.

१४. या दरप्रक्रिये अथवा कामाच्या बाबतीत काही न्यायालयीन वाद निर्माण झाल्यास अकोला न्यायालयात चालेल.

१५. संबंधित ठेकेदाराने वरील नियम व अटी शर्ती मान्य असल्या बाबत चे प्रमाणपत्र सही, नाव व पूर्ण पत्त्या सह दर पत्रक सोबत सादर कराव्यात.

विभाग प्रमुख<br>
फळशास्त्र विभाग<br>
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला